


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : २७७ वा | शुक्रवार दि १६ जानेवारी २०२६ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# भाजपला वगळून शिवसेना-राष्ट्रवादीच्या चर्चा, निकालाआधीच बंद खोलीत खलबतं सुरु...

**वृत्तसंस्था/ सातारा**

राज्यातील महापालिकांसाठी गुरुवारी मतदान झालं. त्याच रात्री झेडपी, पंचायत समिती निवडणुकीसाठी साताऱ्यात राजकीय घडामोडी सुरु होत्या. पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या निवासस्थानी मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, खासदार नितीन पाटील आणि रामराजे नाईक-निंबाळकर यांच्यात रात्री उशीरापर्यंत खलबते झाली. भाजपला वगळून झालेल्या या बैठकीमुळे महायुतीतील बेबनाव उघड झाला आहे. कराड तालुक्यात काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे सूर जुळतील, असेही संकेत मिळत आहेत. साताऱ्यात पालकमंत्री शंभूराज देसाई आणि आमदार महेश शिंदे यांच्या उपस्थितीत गुरुवारी दुपारी शिवसैनिकांचा मेळावा झाला. त्यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेतली. घटक पक्षांनी शिवसैनिकांचा (शिंदे गट) सन्मान केल्यास निश्चितच महायुती म्हणून विचार होईल. वाटाघाटी यशस्वी झाल्या तर एकत्रितपणे निवडणुकीला सामोरे जाऊ. मानसन्मान राखला तर ठीक अन्यथा स्वबळावर लढू किंवा इतर चर्चेचे पर्याय आमच्यासाठी खुले असतील, असे स्पष्ट संकेत पालकमंत्र्यांनी दिले. महायुती झाली नाही तर शिवसेना स्वतंत्र निवडणूक लढवणार आहे. त्यावेळी आम्ही कोणाचाही विचार करणार नाही. राष्ट्रवादी बरोबर (अजित पवार गट) अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. तसेच भारतीय जनता पार्टीकडून सुद्धा कोणत्याही प्रकारचा प्रस्ताव आपल्याला आला नसल्याचे पालकमंत्र्यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले होते. त्यानंतर रात्री भाजपला वगळून शिवसेना आणि राष्ट्रवादी नेत्यांची पालकमंत्र्यांच्या निवासस्थानी कमराबंद बैठक झाली. साताऱ्याची जिल्हा परिषद ही यशवंत विचारांची आहे. त्यामुळे या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला रोखण्यासाठी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस एकत्रित निवडणूक लढवणार असल्याचे संकेत मिळाले. त्या अनुषंगाने दोन्ही पक्षांच्या




नेत्यांमध्ये चर्चेची प्राथमिक फेरी पालकमंत्र्यांच्या निवासस्थानी पार पडली. भाजपला वगळून ही बैठक झाल्याने आता भाजप नेते काय भूमिका घेतात, हे पाहणे महत्त्वाचे आहे. दुसरीकडे कराड उत्तरमध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष एकत्र येण्याची चिन्हे आहेत. पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीला मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, राज्यसभा खासदार नितीन पाटील, विधान परिषदेचे आमदार रामराजे नाईक-निंबाळकर आणि त्यांचे बंधू संजीवराजे नाईक-निंबाळकर उपस्थित होते. बैठकीनंतर पालकमंत्र्यांच्या निवासस्थानातून बाहेर पडताना पत्रकारांनी बैठकीबद्दल विचारले असता, पालकमंत्र्यांचा चहा गोड होता, असे सांगत भाजपला वगळून निवडणूक लढवली जाणार असल्याचे सूचक संकेत रामराजे नाईक-निंबाळकरांनी दिले.

# दोन वाहनं समोरासमोर धडकली, भीषण अपघातात एकाचा मृत्यू, पुणे हळहळलं

**वृत्तसंस्था/ इंदापूर**

इंदापूर: उसाचा ट्रॅक्टर आणि स्विफ्ट गाडी यांच्यामध्ये झालेल्या अपघातात एक जणाचा मृत्यू झाला आहे. तर, दोन जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. सदरचा अपघात भिगवण राशीन राज्य महामार्गावर डिकसळ (तालुका इंदापूर) गावच्या हद्दीत मंगळवारी (१३ जानेवारी) रात्री साडेदहाच्या सुमारास घडला आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ माजली आहे. अतुल बाबूलाल गजरमल (वय ३८ रा. कात्रज ता. करमाळा, जि. सोलापूर) असे अपघातात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीचे नाव आहे. विजय हनुमंत शिंदे (वय ३८) आणि दादासो सर्जेराव डुबे (वय ३५, दोघेही रा. कात्रज ता. करमाळा जि. सोलापूर) हे दोघे गंभीररित्या जखमी झाले आहेत. या अपघाताची माहिती मिळताच भिगवण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी अपघातग्रस्त वाहनं बाजूला करत वाहतूक सुरळीत करण्यात आली. विशेष म्हणजे या ऊस हंगामात बारामती राशीन या राज्य मार्गावरील हा सातवा बळी ठरला असून, ट्रॅक्टर चालकांच्या बेफिकिरीमुळे अपघातांचे प्रमाण वाढत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे यासंदर्भात भिगवण पोलिसांनी दिलेल्या अधिक माहितीनुसार, चारचाकी स्विफ्ट कार (एम. एच. १२ के. वाय. १६१५) ही भिगवण बाजूकडून राशीन बाजूकडे निघाली होती. तर ऊस वाहतूक करणारा ट्रॅक्टर (एम. एच. ४५ एफ ३०२५) हा





बारामतीच्या दिशेने निघाला होता. यावेळी त्या दोन वाहनांमध्ये समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातात सुदैवाने ट्रॅक्टर चालकाला मोठी दुखापत झाली नसली तरी या अपघातात एकाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या अपघातात दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पुढील तपास भिगवण पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक विनोद महांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार विठ्ठल वारघड करीत आहेत. या अपघाताने परिसरात एकच खळबळ माजली अजून काहीकाळ वाहतूक विस्कळीत झाली होती.

# ...आद्य महिला संपादक....




एकोणीसावे शतक हे भारताच्या दृष्टीने, त्यातही महाराष्ट्राच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचे. या काळामध्ये महाराष्ट्राच्या समाजमनात सर्वांगीण जागृती घडविण्याचा प्रयत्न विविध प्रकारे घडून आला. राजकीय जाणिवा, परंपरावादावर प्रहार करणारा, सामाजिक परंपरा नाकारणारा तसेच माणूसपणाला आकार देणारा विचार महाराष्ट्रात जागृत झाला. या काळात महात्मा फुले यांनी सत्यशोधक चळवळ सुरू केली. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून शिक्षणप्रसाराचे बहुमोल कार्य केले. समाजात सुधारणा घडवून आणायच्या असतील तर आधी समाजाला आणि विशेषत: स्त्रीने शिक्षित व्हायला हवे, हे ओळखून स्त्रीशिक्षणाचे काम सुरू केले. हा सामाजिक, राजकीय,आर्थिक संक्रमणाचा, सामाजिक जागृती घडवून आणणारा कालखंड होता. सत्यशोधक समाजाच्या मुशीत तयार झालेल्या कार्यकर्त्यांनी महात्मा फुलेंचा विचार आपल्या कृतिशील कामातून पुढे नेला. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या पुढाकाराने स्त्रियांना शिक्षणाचा जसा अधिकार मिळाला तसाच आपले प्रेरणादायी विचार मांडण्याचा आणि सामाजिक सुधारणेसाठी प्रयत्न करण्याचा हक्कही मिळाला. त्यातूनच अनेक स्त्रिया पुढे आल्या त्यातल्याच एक प्रेरणादायी आणि प्रखर व्यक्तिमत्त्व म्हणजे तानुबाई बिर्जे. तानुबाई या सत्यशोधक चळवळीतील कार्यकर्ते रावसाहेब देवराव कृष्णाजी ठोसर यांच्या कन्या व वासुदेवराव बिर्जे यांच्या पत्नी. वासुदेवराव बिर्जे ही सत्यशोधक होते. तानुबाई आणि वासूदेवराव बिर्जे यांचा विवाह रविवार दिनांक २९ जानेवारी १८९३ या दिवशी सत्यशोधक पद्धतीने पुणे मुक्कामी पार पडला होता. तसेच या विवाहाच्या अनुषंगाने ङ्गशेतकऱ्यांचा कैवारीफ या वृत्तपत्रात गुरुवार दिनांक २६ जानेवरी १८९३ या वर्षीच्या अंकातही वृत्त प्रसिद्ध झाले होते. या विवाहासाठी पुणे सत्यशोधक समाजाने पुढाकार घेतला होता. हे ङ्गशेतकऱ्यांचा कैवारीफ या वृत्तपत्रावरून लक्षात येते. या विवाहाला सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष डॉ. विश्राम रामजी घोले, डॉ. हनुमंतराव घोरपडे, राजण्णा लिंगू, सरदार धोंडिबा धावरे, ङ्गदीनबंधूफकार नारायणराव लोखंडे, पंडिता रमाबाई यांची उपस्थिती होती. ङ्गदीनबंधूफच्या अग्रलेखावरून लक्षात येते की, ङ्गहा विवाह वेताळ पेठेतील (आजची फुले पेठ) दैवज्ञ मंडळी धर्मशाळेत पार पडला होता.फ तसेच या अग्रलेखाच्या समारोपात लग्न चांगले (सुरेख) झाल्याचे नमूद करून संपादक नारायण लोखंडे यांनी ङ्गनूतन जोडप्यास ईश्वर दीर्घायुष्य देवोअसा आशीर्वाद बिर्जे दाम्पत्यास दिला होता. विवाहासाठी मुद्दाम आठ सत्यशोधकीय मंगलाष्टके नव्याने रचून छापून आणली होती. तानुबाई बिर्जे या सत्यशोधक चळवळीतील महत्त्वाची कार्यकर्ती होत्या. ङ्गदीनबंधूफमधून त्या जे सत्यशोधकीय विचार मांडत होत्या त्यावरून त्यांच्यातील एका खंद्या सत्यशोधक कार्यकर्तीचा प्रत्यय येतो. कृष्णराव भालेकर यांनी ङ्गदीनबंधुफवृत्तपत्र १८७७ ला सुरू केले. त्यानंतर नारायण मेघाजी लोखंडे, भास्करराव जाधव आणि वासुदेवराव बिर्जे यांनी क्रमाने ङ्गदीनबंधुफ वृत्तपत्राची जबाबदारी उचलली होती. पुढे वासुदेवराव बिर्जे यांच्या अकाली निधनानंतर काही महिने ङ्गदीनबंधुफ वृत्तपत्राची जबाबदारी भगवंतराव पाळेकरांनी घेतली होती. परंतु, ङ्गदीनबंधुफ वृत्तपत्राच्या धोरणात्मक निर्णयामुळे ते वृत्तपत्रापासून वेगळे झाले. अशा प्रतिकूल परिस्थितीत हे ङ्गदीनबंधुफ बंद पडते की काय असे वाटत होते. या कठीण प्रसंगी तानुबाई बिर्जे यांनी या प्रसंगावर मात करत ङ्गदीनबंधुफ वृत्तपत्राची जबाबदारी आपल्या खांद्यांवर घेतली. अतिशय कठीण प्रसंगांना तोंड देत ही जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे पार पाडली. १९०८ ते १९१३ या काळात बहुजन समाजातील एक स्त्रीने पती निधनानंतर प्रस्थापित व्यवस्थेशी आक्रमकपणे सामना करीत गरीब, अडाणी, पीडित, कुणबी, दलित, स्त्री व मागास जनसमूहांच्या शोषणमुक्तीचा व उन्नतीचा आवाज उठवणारे परिवर्तनवादी विचाराचे वृत्तपत्र यशस्वीपणे चालविणे ही बाब मराठी पत्रकारितेच्या इतिहासात सुवर्णाक्षरांत नोंदविण्यासारखी आहे. तानुबाई यांचे ङ्गदीनबंधुफ वृत्तपत्रामधील लिखाण सर्वसमावेशक असे होते. त्यांनी वेगवेगळ्या गहन विषयांवर आपल्या अग्रलेखांतून प्रकाश टाकला होता. प्राचीन काळातील राज्यव्यवस्थेवर बोलताना त्या म्हणतात, ङ्गरयतेच्या सुख दुः खात या राजघराण्यांना अजिबात रस नव्हता. यामुळे रयतही या घराण्यांपासून फटकाउन राहत असे. राजा, मंत्रिमंडळ आणि प्रशासनातील कारभाऱ्यांकडून रयतेचा सतत छळ होत असे.फ ङ्गदीनबंधुफच्या शनिवार दिनांक २४ ऑगस्ट १९१२ च्या अंकात या अग्रलेखमालेचा तिसरा भाग प्रसिद्ध झाला आहे. या भागात तानुबाईंनी आपल्या लिखाणात धार्मिक आणि प्रादेशिक विविधतेमुळे मवाळ आणि जहाल यांच्यातील वैचारिक मतभेदांमुळे भारतासारख्या खंडप्राय देशात बहुमत लोकानुसारी राज्यपद्धतीस अनुकूल वातावरण नसल्याचे स्पष्ट प्रतिपादन केले आहे. ३१ ऑगस्टच्या १९१२च्या अंकात हिंदू धर्मातील विषमता समाप्त होऊन सामाजिक समता प्रस्थापित होणे अगत्याचे असल्याचे दमदार प्रतिपादन त्यांनी केले आहे. ङ्गसमताधिष्ठित हिंदुस्थानात यानंतर बहुमत लोकानुसारी राजपद्धतीस राजकीय व सामाजिक वातावरण तयार होईल,फ या तानुबाईंच्याआशावादाचा फलश्रुती अजूनही सगळीकडे दिसून येत नाही. १७ ऑगस्ट १९१२ चा अपवाद वगळता ही राजकीय अग्रलेखमाला त्यांनी सलग महिनाभर लिहिली.




## दुचाकीची धडक; पादचाऱ्याचा मृत्यू




वृत्तसंस्था/ चिखली

चिखली मेरा चौकी परिसरात रस्त्याच्या कडेला पायी चालत असलेल्या एका प्रौढाला भरधाव दुचाकीने धडक दिल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना १४ जानेवारीला रात्री घडली. रमेश गणपत मोरे (५५, रा आंत्री खेडेकर, ता. चिखली) असे मृताचे नाव आहे. रमेश मोरे हे रात्री पायी जात असताना भरधाव दुचाकीस्वाराने त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला-दरम्यान, अपघातानंतर दुचाकीस्वारही गंभीर जखमी झाला असून त्याला उपचारासाठी चिखली येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# मराठी माणूस ठाकरेंच्या पाठीमागे किती राहिला?



**मुंबई :** राज्यातील २९ महापालिकांसाठी आज मतदान पार पडल्यानंतर एक्झिट पोलची आकडेवारी समोर आली आहे. एक्सिस माय इंडियाच्या अंदाजानुसार, मुंबईत सत्ताबदल होण्याची शक्यता आहे. तर भाजप आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना मुंबईत मुसंडी मारण्याची शक्यता आहे. भाजप आणि शिवसेना शिंदे गटाला मुंबईत २२७ जागांपैकी १३१ ते १५१ असं प्रचंड बहुमत मिळण्याची शक्यता आहे. तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि मनसे पक्षांना ५८ ते ६८ जागांवर यश मिळण्याची शक्यता आहे. एक्सिस माय इंडियाने वयोगटानुसार कुणी कोणत्या पक्षाला किती टक्के मतदान केलं याची देखील आकडेवारी जाहीर केली आहे. पोलनुसार, नव्या मतदारांनी म्हणजेच १८ ते २५ वयोगटातील ४७ टक्के तरुणांनी भाजपला मतदान केलं आहे. तर २५ टक्के नव्या मतदारांनी शिवसेना ठाकरे गटाला, १५ टक्के मतदारांनी काँग्रेसला, तर १३ टक्के इतर नव्या मतदारांनी म तदान केल्याचा अंदाज आहे.२६ ते ३५ वयोगटातील मतदरांनी ४१ टक्के भाजपला, ३१ टक्के ठाकरे गटाला, १७ टक्के काँग्रेसला तर ११ टक्के इतरांना मतदान केल्याचा अंदाज आहे. ३६ ते ५० वयोगटातील ४३ टक्के नागरिकांनी भाजपला, ३१ टक्के मतदारांनी ठाकरे गटाला, १० टक्के नागरिकांनी काँग्रेसला तर १६ टक्के म तदारांनी इतरांना मतदान केल्याचा अंदाज आहे.५१ ते ६० वयोगटातील ४० टक्के नागरिकांनी भाजपला, ३६ टक्के ठाकरे गटाला, ११ टक्के काँग्रेसला आणि १३ टक्के इतरांना मतदान केल्याचा अंदाज आहे. तर ६१ पेक्षा जास्त वयोगटाच्या नागरिकांनी ३६ टक्के भाजपला, ३९ टक्के ठाकरे गटाला, १५ टक्के काँग्रेसला आणि १० टक्के इतरांना मतदान केल्याचा अंदाज आहे.४९ टक्के मराठी जनतेने शिवसेना ठाकरे गटाला मतदान केल्याचा अंदाज आहे. तर ३० टक्के मराठी मतदारांनी भाजपला मतदान केल्याचा अंदाज आहे. तर काँग्रेसला ८ आणि इतरांना १३ टक्के मतदान केल्याचा अंदाज आहे. ६८ टक्के उत्तर भारतीय नागरिकांनी भाजपला मतदान केल्याचा अंदाज आहे. तर १९ टक्के उत्तर भारतीयांनी ठाकरे गटाला मतदान केल्याचा अंदाज आहे. ६१ टक्के दक्षिण भारतीयांनी भाजपला मतदान केल्याचा अंदाज आहे. तर २१ टक्के दक्षिण भारतीयांनी ठाकरे गटाला मतदान केल्याचा अंदाज आहे.

१२ टक्के मुस्लिम मतदारांनी भाजपला मतदान केल्याचा अंदाज आहे. तर २८ टक्के मुस्लिम मतदारांनी ठाकरेंच्या शिवसेनेला मतदान केल्याचा अंदाज आहे. तसेच काँग्रेसला ४१ टक्के मुस्लिम मतदारांनी मतदान केल्याचा अंदाज आहे. तर इतरांना १९ टक्के मुस्लिम मतदारांनी मतदान केल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. ६९ टक्के गुजराती समाजाने भाजपला मतदान केल्याचा अंदाज आहे. तर १८ टक्के गुजराती समाजाने ठाकरे गटाला मतदान केल्याचा अंदाज आहे.

## ठाकरे बंधूंना सत्तेची किती संधी? काँटे की टक्कर दाखवणारी आकडेवारी





**मुंबई :** मुंबई महापालिका निवडणुकीचा निकाल उद्या जाहीर होईल. तब्बल ९ वर्षांनी मुंबई महापालिकेसाठी मतदान झालं. या निवडणुकीत कोणाला बहुमत मिळणार, याबद्दल उत्सुकता आहे. मुंबई महापालिका निवडणुकीत भाजपची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. तर ठाकरे बंधूंसाठी ही निवडणूक अस्तित्त्वाची लढाई आहे. त्यामुळे उद्याच्या मतमोजणीकडे सगळ्यांचं लक्ष लागलं आहे. मतदान संपताच काही एक्झिट पोल्स समोर आले. सामच्या एक्झिट पोलनुसार भाजप-शिंदेसेना यांच्या महायुतीला बहुमताचा आकडा गाठण्यात यश मिळू शकेल.सामच्या एक्झिट पोलमधील आकडेवारीनुसार ठाकरे बंधू आणि शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस यांची युती सत्तेपासून दूर राहताना दिसत आहे. मुंबईत महापालिकेच्या एकूण २२७ जागा आहेत. बहुमतासाठी ११४ जागांचा आकडा गाठण्याची गरज आहे. सामच्या एक्झिट पोलनुसार ठाकरेसेनेला ६५, म नसेला १० आणि शरद पवारांच्या पक्षाला २ जागा मिळण्याचा अंदाज आहे. त्यामुळे ही आघाडी ७७ पर्यंत जाते. काँग्रेस आणि वंचितला २३ जागा मिळण्याचा अंदाज आहे. ठाकरे बंधू, राष्ट्रवादी शप आणि काँग्रेस-वंचित सोबत आल्यास १०० चा आकडा होतो.दुसरीकडे भाजपला ८४ जागा मिळण्याचा अंदाज आहे. तर शिंदेसेनेला ३५ जागा मिळतील, अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे. दोन्ही पक्षांचा आकडा ११९ पर्यंत पोहोचतो. असाच निकाल लागल्यास महायुतीकडे काठावरचं बहुमत असेल. महायुतीचा आकडा आणखी थोडा खाली आल्यास ठाकरे बंधूंची युती आणि काँग्रेस-वंचित आघाडीला एकत्र येऊन सत्तेची संधी असेल.

## प्रणिती शिंदेंना मतदारांची साथ की धक्का?

**सोलापूर :** महाराष्ट्रातील २९ म हानगरपालिकांच्या निवडणुकीचा रणसंग्राम अंतिम टप्प्यात आला असून, आज १५ जानेवारी रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. राज्यातील सत्तेचे समीकरण ठरवणाऱ्या या मिनी विधानसभेत कोण बाजी मारणार, याची उत्सुकता शिगेला पोहोचली असतानाच खळबळजनक एक्झिट पोल समोर आला आहे. या अंदाजानुसार, सोलापूर महानगरपालिकेत भारतीय जनता पक्ष स्पष्ट बहुमतासह सत्तेत येण्याची चिन्हे आहेत.डिसेंबर महिन्यापासून सुरू झालेल्या निवडणूक प्रचारात सोलापूरमध्ये महायुती आणि म हाविकास आघाडीमध्ये अटीतटीची लढत पाहायला मिळाली. स्थानिक मुद्द्यांपासून ते राज्याच्या राजकारणापर्यंत अनेक विषय प्रचारात गाजले. अखेर आज म तदारांनी आपला कौल ईव्हीएममध्ये बंद केला आहे. दरम्यान, या एक्झिट पोलने विविध केंद्रांवर घेतलेल्या कलानुसार, सोलापूरकरांनी विकासाच्या मुद्द्यावर भाजपला झुकते माप दिल्याचे दिसत आहेसामच्या एक्झिट पोलनुसार, सोलापूर महापालिकेच्या एकूण जागांपैकी भाजपला सर्वाधिक जागा मिळताना दिसत आहेत. मोठा धक्का काँग्रेस नेत्या प्रणिती शिंदे यांना बसण्याची शक्यता आहे.

## लातूरमध्ये साड्या वाटताना एकजण ताब्यात, तर नांदेडमध्ये व्हिडीयो व्हायरल

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड आणि लातूर महापालिकेसाठी गुरुवारी मतदान झाले. सर्वच ठिकाणी किरकोळ अपवाद वगळता शांततेत मतदान झाले. प्राथमिक अंदाजानुसार सरासरी ५८ टक्के मतदान झाले. सायंकाळच्या सत्रात साडेपाचनंतर विविध महापालिकांमधील अनेक मतदान केंद्रांवर मतदारांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या होत्या. म हापालिका निवडणुकीची रणधुमाळी गेली महिनाभर रंगली होती. गुरुवारी सकाळी साडेसातपासून सर्वत्र मतदार उत्साहात घराबाहेर पडले. लातूर, नांदेड, छत्रपती संभाजीनगरसह परभणी आणि जालन्यात लांबच लांब रांगा लागल्या होत्या. दुपारच्या सत्रात गर्दी ओसरली. सायंकाळी पुन्हा रांगा लागल्या होत्या. दुपारी दीडपर्यंत सरासरी ३५ टक्क्यांपर्यंत मतदान झाले होते. सायंकाळनंतर मतदानाचा वेग वाढला. निवडणूक विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार प्राथमिक अंदाजानुसार छत्रपती संभाजीनगरमध्ये ५८ टक्के, जालना ६० टक्के, परभणीत ५८ टक्के, नांदेड ६१ टक्के तर लातूरमध्ये ५५ टक्के मतदान झाले. लातूरमध्ये साड्या वाटताना एकाला ताब्यात घेण्यात आले. एसएसटीच्या



तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला. नांदेडमध्ये पैसे वाटतानाचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता. तसेच दुसऱ्या घटनेत दोन उमेदवार एकमेकांना शिविगाळ करताना आढळून आले. याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले. परभणी महापालिका निवडणूक मतदानादरम्यान एक जण पैसे वाटत असल्याचे पोलिसांना आढळून आले. त्याला ताब्यात घेण्यात आले. जालना येथे एक बोगस मतदार दुसऱ्याच्या नावावर मतदान करण्याच्या प्रयत्नात होता. त्याला ताब्यात घेण्यात आले.छत्रपती संभाजीनगरमध्येही नारेगाव, मुकुंदवाडी, चिकलठाणा, इटखेडा, पंचायत समिती मतदान केंद्रांवर बोगस मतदान होत असल्याच्या आरोपावरुन तणाव निर्माण झाला होता. काही ठिकाणी कार्यकर्त्यांमध्ये वादावादीच्या किरकोळ घटना घडल्या. एका उमेदवाराला मारहाण करण्यात आल्याचेही सांगण्यात आले.

# मुंबईत बेरोजगारांचं सर्वाधिक मतदान भाजपला, कुणाचं किती टक्के मतदान?



**मुंबई :** मुंबई महापालिका निवडणुकीचा निकाल उद्या जाहीर होणार आहे. त्याआधी एक्सिस माय इंडियाच्या एक्झिट पोलची आकडेवारी समोर आली आहे. एक्सिस माय इंडियाच्या अंदाजानुसार, मुंबईत सत्तापालट होणार आहे. ठाकरेंची शिवसेनेच्या हातून सत्ता निसटणार असल्याचा अंदाज आहे. तर भाजप आणि शिंदेंची शिवसेना विजयी होण्याची शक्यता आहे. भाजप आणि शिवसेनेच्या युतीला १३१ ते १५१ जागांवर यश मिळणार असल्याची शक्यता आहे. तसेच व्यवसायानुसार, कोणी कुणाला किती मतदान केलं? याबाबतही सर्वेक्षण करण्यात आल्याची माहिती आहे. या अंदाजानुसार, बेरोजगारांनी सर्वाधिक मतदान भाजपला केल्याचा अंदाज आहे.व्यवसायावर आधारित मतजानाची टक्केवारी पाहिली तर भाजपला ३७ टक्के बेरोजगारांनी म तदान केल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर ४५ टक्के विद्यार्थ्यांनी, ४० टक्के मजुरांनी आणि ४० प्रशिक्षित प्रोफेशनल मतदारांनी, ३८ टक्के प्रोफेशनल, ४६ टक्के स्वरोजगार, ३९ टक्के प्राध्यापक, ३९ टक्के निवृत्त, ३६ टक्के ऑटो रिक्शा ड्रायव्हर, ४४ टक्के गृहिणी, ४१ टक्के प्रायव्हेट जॉब आणि ३५ टक्के सरकारी नोकरी करणाऱ्यांनी मतदान केलं आहे.शिवसेना ठाकरे गटाला ३४ टक्के बेरोजगारांनी मतदान केल्याचा अंदाज आहे. तर विद्यार्थ्यांना ३५ टक्के मतदान केल्याचा अंदाज आहे. यासोबत ३३ टक्के मजुरांनी, ३० टक्के प्रशिक्षित प्रोफेशनल, ४० टक्के प्रोफेशनल, ३१ टक्के स्वरोजगार, ३० टक्के प्राध्यापक, ३८ टक्के निवृत्त, ३२ टक्के ऑटो-टॅक्सी ड्रायव्हर, २१ टक्के गृहिणी, ३२ टक्के प्रायव्हेट जॉब, ३९ टक्के सरकारी नोकरी करणाऱ्या मतदारांनी मतदान केल्याचा अंदाज आहे.मुंबईत १५ टक्के बेरोजगारांनी काँग्रेसला मतदान केलं आहे. तर ९ टक्के विद्यार्थी, १५ टक्के मजूर, १६ टक्के प्रशिक्षित प्रोफेशनल, ६ टक्के प्रोफेशनल, १३ टक्के स्वरोजगार, १६ टक्के प्राध्यापक, १० टक्के निवृत्त, १४ टक्के ऑटो-टॅक्सी ड्रायव्हर, १३ टक्के गृहिणी, ११ टक्के प्रायव्हेट जॉब, तर १७ टक्के सरकारी नोकरी करणाऱ्या मतदारांनी काँग्रेसला मतदान केलं आहे.

मुंबईत १४ टक्के बेरोजगारांनी इतरांना मतदान केलं आहे. तर ११ टक्के विद्यार्थी, १२ टक्के मजूर, १४ टक्के प्रशिक्षित प्रोफेशनल, १८ टक्के ऑटो-टॅक्सी ड्रायव्हर, १२ टक्के गृहिणी, १६ टक्के प्रायव्हेट जॉब, ९ टक्के सरकारी नोकरी, १६ टक्के प्रोफेशनल, १० टक्के स्वरोजगार, १५ टक्के प्राध्यापक, १३ टक्के निवृत्त मतदारांनी इतरांना मतदान केल्याचा अंदाज आहे.

# पुण्यात ऑनलाईन कॅब बूक, चालकाचा जीव घेतला, कार विकण्याचा प्रयत्न, पोलिसांनी चक्रं फिरवली

**पुणे :** पुण्यात ऑनलाइन कॅब बुक केल्यानंतर रायगडमधील माणगावच्या हद्दीत जाऊन कॅब चालकाचा खून केल्याची घटना उघड झाली. खूनानंतर त्याची कार चोरून तिची विक्री करण्याच्या प्रयत्नात असताना बाणेर पोलिसांनी सापळा रचून मुख्य आरोपीला पकडले. त्यानंतर उर्वरित दोघांनाही ताब्यात घेण्यात आले. आदित्य गणेश भगत (वय २२, रा. भोसरी) असे खून झालेल्याचे नाव आहे.आदित्य भगत याच्या खून प्रकरणी माणगाव (जि. रायगड) पोलिसांत गुन्हा दाखल आहे. या प्रकरणी अनिकेत महेश वाघमारे (२६) आणि तुषार उर्फ सोन्या शरद पाटोळे (२४) यांना यापूर्वीच अटक करण्यात आली आहे.ताम्हिणी घाटात मित्राचा खून करून फरारी झालेला मुख्य आरोपी सोन्या उर्फ प्रज्वल संतोष हंबीर (राहणार खांदवेनगर, वाघोली,



ता. हवेली) यास दौंड ते पुणे प्रवासात पुणे रेल्वे पोलिसांनी मंगळवारी (१३ जानेवारी) इंद्रायणी इंटरसिटी एक्स्प्रेसमधून अटक केली असल्याची माहिती दौंड लोहमार्ग पोलिस ठाण्याचे निरीक्षक राजेंद्र गायकवाड यांनी दिली.तपास पथकातील पोलिस कर्मचारी प्रीतम निकाळजे मुंबई-बेंगळुरू बाह्यवळण मार्गावर गस्त घालत असताना नन्हे पुलाजवळ संशयास्पद व्यक्ती कार विक्रीसाठी थांबल्याची माहिती त्यांना मिळाली. त्यानुसार पोलिस पथकाने सापळा रचून वाघमारेला पकडले. त्याच्या ताब्यातून संबंधित कार जप्त केली. वाघमारेने साथीदारांच्या साथीने खून केल्याची कबुली दिली. ताम्हिणी घाटात सणसवाडीच्या हद्दीत जागा खरेदी-विक्रीसाठी आलेल्यांना मृतदेह दिसला. त्यांनी माणगाव पोलिसांना माहिती दिली. मृतदेहाची ओळख पटली नव्हती. पोलिसांना त्याच्या हातातील घड्याळ दिसले. त्यावरून पोलिसांना मृताची ओळख पटवली.या गुन्ह्याची नोंद माणगाव पोलिस ठाण्यात आधीच केली होती. बाणेर पोलिसांनी आरोपींना पुढील तपासासाठी माणगाव पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. ही कारवाई वरिष्ठ पोलिस निरीक्षक चंद्रशेखर सावंत, गुन्हे शाखेच्या पोलिस निरीक्षक अलका सरग आणि सहायक पोलिस निरीक्षक कैलास डाबेराव यांच्या पथकाने केली.पुण्याहून म हाबळेश्वरला सहलीसाठी निघाले असताना पैशाच्या वादातून आदित्य याचा इतर तिघांनी गळा आवळून खून केला होता. मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात फेकून आरोपी फरारी झाले होते.

प्रज्वल सोलापूरहून रेल्वेने पुण्याकडे येत असल्याची गुप्त माहिती पुणे लोहमार्ग पोलिस अधीक्षक अश्विनी सानप यांना मि ळाली. त्यांनी त्वरित स्थानिक गुन्हे शाखा आणि दौंड लोहमार्ग पोलिसांना सूचना दिल्या. दोन पथके तयार करून पुणे आणि दौंड रेल्वे स्थानकांवर सापळा रचला. इंद्रायणी इंटरसिटी एक्स्प्रेसच्या डी-७ डब्यातून प्रज्वलला ताब्यात घेण्यात आले. पोलिस उपनिरीक्षक दयानंद शरणार्थी, हवालदार आनंद वाघमारे, शिपाई मनोज म्हेत्रे, गोकुळ हिवाळे व संदीप उसरे यांच्या पथकाने ही कारवाई केली. प्रज्वल याला पुणे रेल्वे स्थानकावर रायगड पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

## कारचे तीन टायर फुटले, तरीही १५ किमी वाहन दामटले ; थरारक पाठलाग

**नाशिक :** नाशिक-पुणे महामार्गावर गोवंश जनावरांच्या मांसाची चोरटी वाहतूक करणाऱ्या इनोव्हा कारचा गोरक्षकांकडून थरारक पाठलाग करण्यात आला. पहाटेच्या सुमारास तीन टायर फुटूनही चालकाने सुमारे १५ किलोमीटर वाहन पळवले. अखेर गोंदे फाटा परिसरात म हामार्गावर कार सोडून चालकाने पलायन केले. या कारमधून सुमारे तीन हजार किलो (तीन टन) गोवंश जनावरांचे मांस जप्त करण्यात आले.ही घटना ११ जानेवारी रविवारी रोजी पहाटे ५ ते ५.४५ वाजेच्या सुमारास नांदूरशिंगोटे, दोडी, दापूर व गोंदे फाटा परिसरात घडली. संगमनेर येथून नाशिकच्या दिशेने गोवंश जनावरांच्या म ांसाची वाहतूक होणार असल्याची माहिती नाशिक येथील गोरक्षकांना मिळाली होती. त्यानुसार नांदूरशिंगोटे येथे सापळा रचण्यात आला होता. पहाटे संगमनेरकडून येणारी इनोव्हा कार (क्र. एम. एच. ३८, जे ००९९) थांबवण्याचा प्रयत्न केला असता चालकाने वाहन वळवून नांदूरशिंगोटे गावातून पळ काढला. त्यानंतर पुणे महाम ार्गाने दोडी, दापूर, गोंदे असा पाठलाग सुरू राहिला. यादरम्यान वाहनाचे तीन



टायर फुटले, तरीही चालकाने केवळ डिस्कवर गाडी पळवली. अखेर गोंदे फाटा परिसरात भारत पेट्रोल पंपाजवळ चालकाने वाहन सोडून पलायन केले.यानंतर गोरक्षकांनी नांदूरशिंगोटे पोलिस दूरक्षेत्राला माहिती दिली. पोलिसांनी वाहन ताब्यात घेऊन तपासणी केली असता मागील सीट काढून त्याठिकाणी प्लास्टिक कव्हरमध्ये भरलेले सुमारे तीन टन गोवंश जनावरांचे मांस आढळून आले. याप्रकरणी वावी पोलीस ठाण्यात इनोव्हा चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी पुढील तपास करत संगमनेरातील मोमि नपुरा भागातून १३ जानेवारीच्या मध्यरात्री सलमान मणियार यास ताब्यात घेऊन अटक केली. तोच इनोव्हा कारमधून गोवंश जनावरांच्या मांसाची वाहतूक करत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## नशेत जन्मदात्या आईलाच गोळी झाडून संपवलं

**सिंधुदुर्ग :** तळकोकणात सिंधुदुर्ग जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली असून आपल्या वृद्ध आईचा पोटच्या मुलानेच गोळी झाडून हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. वेंगुर्ले तालुक्यातील अणसुरे या गावात ही घटना घडली आहे. उमेश वासुदेव सरमळकर नामक मुलाने आपल्या ६५ वर्ष आईची हत्या केली आहे. ठासणीच्या बंदुकीने ही हत्या केली असून, मकर संक्रांतीच्या रात्री हा सगळा धक्कादायक प्रकार घडला आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, दारूच्या व्यसन असलेल्या या ४० वर्षीय मुलानं आपल्या जन्मदात्या आईवरच गोळी झाडून ही हत्या केली आहे. वासंती वासुदेव सरमळकर असं या वृद्ध महिलेचं नाव आहे.या घटनेची माहिती मिळताच वेंगुर्ला पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आहे. संशयित आरोपी उमेश याला वेंगुर्ले पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. ही हत्या करण्यामागचं नेमकं कारण अद्याप सम जलेलं नाही. मात्र, पुढील तपासात नेमकं कारण समोर येण्याची शक्यता आहे. उमेश हा दारूचा व्यसनी होता, त्याची मानसिक स्थितीही अनेकदा बिघडत असे.

## भावांसोबत पत्नीला क्रूरपणे संपवलं, मग बॉडीचे तुकडे करुन ड्रममध्ये भरलं

**लखनऊ :** उत्तर प्रदेशातील फिरोजाबाद जिल्ह्यातून एक भयानक घटना समोर आली आहे. नागला खंगार पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नागला नांदे गावात एका व्यक्तीने आपल्या तीन भावांसह मिळून आपल्या पत्नीची निर्घृण हत्या केली आहे. इतकंच नाही तर त्यानंतर या महिलेच्या मृतदेहाचे धारदार शस्त्राने दोन तुकडे करण्यात आले. त्यानंतर तिचं शिर ड्रममध्ये लपवण्यात आलं, असा आरोप करण्यात आला आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि तपास सुरू केला. घटनास्थळी एका ड्रममधून महिलेचं डोकं सापडलं, तर धड घराच्या आत एका खाटेवर पडलेले आढळून आले.नागला नांदे येथे मंगळवारी (१३ जानेवारी) सकाळी ही घटना उघडकीस आली. बातमी पसरताच गावात एकच खळबळ माजली. मृत महिलेची ओळख लता देवी अशी झाली आहे. लता देवी आणि आशुतोष यांचं लग्न २५ वर्षांपूर्वी झालं होतं. या घटनेच्या प्राथमिक तपासानुसार, त्यांच्यात गेल्या बऱ्याच काळापासून मालमत्तेवरून कौटुंबिक वाद सुरु होता. १२ जानेवारीच्या




रात्री याच वादातून त्यांनी निर्घृणपणे हत्या करण्यात आली. पोलीस सध्या सर्व बाजूंनी या प्रकरणाचा तपास करत आहेत. या घटनेनंतर, गावात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.या हत्येच्या घटनेने संपूर्ण गावात एकच खळबळ माली आहे. पोलिसांनी दिलेल्या अधिक माहितीनुसार, बुधवारी सकाळी नागला नांदे गावात लता देवी नावाच्या महिलेचा मृतदेह संशयास्पद परिस्थितीत आढळल्याची माहिती मिळाली होती. घटनास्थळी पोहोचल्यानंतर पोलिस स्टेशन आणि फील्ड युनिटने उपलब्ध असलेले सर्व पुरावे गोळा केले. लता देवीच्या म ाहेरी देखील या घटनेची माहिती देण्यात आली. तिचे पालक घटनास्थळी पोहोचले आणि तिचा मृतदेह पाहून त्यांनी एकच आक्रोश केला.

## भररस्त्यात गाठत संपवलं ; वाचवायला आलेल्या मुलावरही वार

**जळगाव :** आज मकर संक्रांतीचा दिवस आणि या गोड बोलण्याच्या दिवसालाच एक धक्कादायक घटना घडली आहे. मकर संक्रांतीच्या दिवशी बुधवारी १४ जानेवारी रोजी दुपारी जुन्या वादातून बाळकृष्ण सदाशिव कोळी (वय ४५) याची चॉपरने वार करून निर्घृण हत्या करण्यात आली आहे. या हल्ल्यात बाळकृष्ण यांचा लहान मुलगा देखील जखमी झाला आहे.बाळकृष्ण सदाशिव कोळी (वय ४५ राहणार बोलाणे तालुका जळगाव ) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. बाळकृष्ण कोळी आणि संशयित आरोपी आकाश रामकृष्ण कोळी यांच्यात जुना वाद होता. बुधवारी मकर संक्रांतीच्या दिवशी बोलाणे



येथील बस स्टँड परिसरात हा वाद पुन्हा उफाळून आला. रागाच्या भरात आकाश कोळी यांनी बाळकृष्ण यांच्यावर चॉपरने हल्ला चढवला. बाळकृष्ण यांच्यावर तीन वार करण्यात आल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. हल्ला होत असताना बाळकृष्ण यांचा लहान मुलगा आपल्या वडिलांना वाचण्यासाठी मध्ये धावला. यावेळी हल्लेखोराच्या चॉपरचा वार मुलाच्या हाताला लागला आणि तो जखमी झाला आहे.नवीन वर्षाचा आज पहिलाच सण हा मकर संक्रांती आहे. याच दिवशी भरस्त्यात घडलेल्या या घटनेमुळे गावात प्रचंड खळबळ उडाली आहे.

मयत बाळकृष्ण यांच्या नातेवाईकांनी दिलेल्या माहितीनुसार, मुख्य संस्थेत आकाश कोळी यांच्यासोबत त्यांचे वडील रामकृष्ण तालाचंद कोळी आणि काका प्रकाश ताराचंद कोळी हे देखील घटनास्थळी उपस्थित होते, या सर्वांच्या उपस्थितीत घटना घडल्याची माहिती आहे.बाळकृष्ण कोळी हे बोलाणे गावात मजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. त्यांच्या निधनामुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात वृद्ध आई-वडील भाऊ पत्नी, जयेश आणि विशाल दोन मुलं असा परिवार आहे. या प्रकरणामुळे बाळकृष्ण यांचे भाऊ नरेंद्र सदाशिव कोळी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून जळगाव तालुका पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती. पोलिस आरोपींच्या शोधासाठी पथकं रवाना करत असून पुढील तपास करत आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# भारत-पाक मॅचची तिकीट विक्री थांबली



**मुंबई :** भारतविरुद्ध न्यूझीलंड यांच्यात एकदिवसीय मालिका सुरु आहे. या मालिकेतील दोन सामने रंगले ज्यात एकदा भारताचा विजय झाला आणि दुसऱ्या सामन्यात न्यूझीलंडचा विजय झाला. तिसरा सामना रविवारी रंगणार आहे. या नंतर टी-२० मालिका ही खेळवली जाईल. आता यानंतर पुढील महिन्यात टी-२० विश्वचषक खेळवला जाईल. या विश्वचषकासाठी चाहते उत्सुक असल्याचे दिसत आहे पण विशेष, म्हणजे पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यासाठी लोक उत्सुक आहेत. आता पुन्हा एकदा IND vs PAK Match क्रेझ पाहायला मिळाली आहे.भारत आणि श्रीलंका संयुक्तपणे आयोजित केलेला T20 World CuP 2026 7 February सुरू होणार आहे. आयसीसीने सामन्यांसाठी तिकिटे विक्री सुरू केली आहे. यजमान भारतीय संघ २०२६ च्या टी-२० विश्वचषक गटात नामिबिया, नेदरलँड्स, अमेरिका आणि पाकिस्तानसह समाविष्ट झाला आहे. India vs Pakistan यांच्यातील या स्पर्धेतील सर्वात मोठा सामना १५ फेब्रुवारी रोजी कोलंबो येथील आर. प्रेमदासा स्टेडियमवर खेळला जाईल. या IND vs PAK Match Ticket विक्रीबद्दल भारतीय चाहते इतके उत्साहित आहेत की १४ जानेवारी रोजी तिकीट विक्री सुरू झाली तेव्हा लाखो चाहत्यांनी लॉग इन केल्यामुळे काही मिनिटांतच संपूर्ण वेबसाइट क्रॅश झाली.आयसीसीने टी-२० विश्वचषक सामन्यांसाठी तिकिटे विक्रीची जबाबदारी BookMyShow वर सोपवली आहे. १४ जानेवारी रोजी भारत-पाकिस्तान सामन्यासाठी तिकिटे विक्री सुरू झाली तेव्हा लाखो चाहत्यांनी अचानक सामन्यासाठी तिकिटे खरेदी करण्यासाठी लॉग इन केले, ज्यामुळे प्लॅटफॉर्मचा सर्व्हर ओव्हरलोड झाला आणि संपूर्ण वेबसाइट क्रॅश झाली. BookMyShow च्या एका सूत्राने वृत्तसंस्थेला सांगितले की, एकाच वेळी मोठ्या संख्येने लॉगिन केल्याने सिस्टमवर मोठा ताण पडला, ज्यामुळे क्रॅश झाली. BookMyShow ने इंस्टाग्रामवर या घटनेबाबत अधिकृत स्पष्टीकरण देखील पोस्ट केले आहे.जागतिक क्रिकेटमध्ये, भारतीय आणि पाकिस्तानी संघ कुठेही खेळत असले तरी, स्टेडियममध्ये चाहत्यांची गर्दी स्पष्टपणे दिसून येते आणि दोन्ही संघांमधील आगामी ढ२० विश्वचषक २०२६ च्या सामन्यासाठीही अशीच परिस्थिती पाहायला मिळत आहे. अशा परिस्थितीत, तांत्रिक समस्या सोडवल्यानंतर लवकरच तिकिटांची विक्री पुन्हा सुरू होईल अशी अपेक्षा आहे. भारतीय संघ स्पर्धेतील पहिला सामना ७ फेब्रुवारी रोजी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर अमेरिकेविरुद्ध खेळेल, त्यानंतर १२ फेब्रुवारी रोजी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर नामिबिया संघाविरुद्ध दुसरा सामना खेळेल.

# ज्यांच्यामुळे स्पर्धाच बंद पाडली, ते नझमूल इस्लाम आहेत तरी कोण?



**नवी दिल्ली :** बांगलादेशच्या क्रिकेटमध्ये मोठा भूकंपच आला. कारण बांगलादेशच्या खेळाडूंनी थेट संप पुकारला आणि त्यांनी बांगलादेश प्रीमिअर लीग ही स्पर्धाच बंद पाडण्याचा निर्णय घेतला. पण बांगलादेशच्या खेळाडूंनी जो संप पुकारण्याचा निर्णय घेतला, तो एकाच व्यक्तीमुळे घेतला आहे आणि ती व्यक्ती आहे नझमूल इस्लाम. पण हे नझमूल इस्लाम नेमके आहेत तर कोण आणि त्यांनी असं काय केलं आहे, ही सर्व माहिती आता समोर आली आहे.भारताबरोबर बांगलादेशने पंगा घ्यायचे ठरवले. बांगलादेशचे सामने आम्ही भारतामध्ये येऊन खेळणारच नाही, अशी भूमिका त्यांनी घेतली. आयसीसी बांगलादेशच्या क्रिकेट संघटनेबरोबर संवाद साधण्यासाठी तयार होती. आपल्याकडून कोणता सदस्य आयसीसीबरोबर संवाद साधेल, असा विचार संघटनेने केला. त्यानंतर बांगलादेशच्या क्रिकेट संघटनेचे संचालक नझमूल इस्लाम यांची आयसीसीबरोबर संवाद साधण्यात मोठी भूमिका असेल, असा निर्णय घेण्यात आला. नझमूल इस्लाम हे बांगलादेशच्या क्रिकेट संघटनेचे संचालक असून त्यांच्याकडे संघटनेची मोठी जबाबदारी आहे.नझमूल इस्लाम हे आयसीसीबरोबर भारतामधील वर्ल्ड कप सामन्यांबाबत संवाद साधत होते. आम्ही भारतामध्ये वर्ल्ड कपचा एकही सामना खेळणार नाही, असे त्यांनी आयसीसीला सांगितले होते. पण हे सर्व सुरु असताना भारतामधील स्पॉन्सर असलेल्या काही कंपन्यांनी बांगलादेशमधील खेळाडूंची स्पॉन्सिरशिप काढून घेतली. त्याचा बांगलादेशच्या खेळाडूंना फटका बसला, त्यानंतर खेळाडूंनी भारताबाबत सौम्य धोरण अवलंबले आणि सामने खेळवले तरी चालतील, अशी भूमिका घेतली.

# वर्ल्ड कपमध्ये वैभव सूर्यवंशीची अष्टपैलू कामगिरी; गोलंदाजीतही ठरला गेमचेंजर




**बुलोवायो :** वैभव सूर्यवंशी हा कशी धडाकेबाज फटकेबाजी करतो, हे सर्वांनाच माहिती आहे. पण वैभव सूर्यवंशीने १९ वर्षांखालील वर्ल्ड कपच्या पहिल्याच सामन्यात आपल्या गोलंदाजीने कमाल केल्याचे पाहायला मिळाले. जे या सामन्यात कोणालाही जमलं नाही ते यावेळी वैभव सूर्यवंशीने करून दाखवलं आहे.भारताचा १९ वर्षांखालील वर्ल्ड कपमध्ये पहिला सामना होता तो अमेरिकेबरोबर. भारताने अमेरिकेला सुरुवातीपासूनच धक्के द्यायला सुरुवात केली होती. अमेरिकेची १ बाद १ अशी सुरुवात झाली होती. त्यानंतर भारताने अमेरिकेला एकामागून अक धक्के द्यायला सुरुवात केली. यामध्ये आघाडीवर होता तो भारताचा हेनिल पटेल. भारताने या सामन्यात अमेरिकेची ५ बाद ३४ अशी अवस्था केली होती. त्यावेळी भारताचा संघ अमेरिकेला लवकरच ऑल आऊट करेल, असे सर्वांना वाटले होते. पण अमेरिकेच्या संघाने तर यावेळी शतकाची वेसही ओलांडली होती. अमेरिकेचा नितीन सुदिनी हा धडाकेबाज फलंदाजी करत होता आणि संघाला त्याने शतकाची वेस ओलांडून दिली होती.भारताचा कर्णधार आयुष म्हात्रेने सुदिलीना बाद करण्यासाठी बऱ्याच गोलंदाजांच्या हाती चेंडू दिला होता. पण कोणत्याही गोलंदाजाला त्याला बाद करता येत नव्हते. जर तो असाच खेळत राहीला असता तर त्याने शतकही पूर्ण केले असते आणि संघाला धावांचा डोंगर उभारून दिला असता. आयुषकडे फारच कमी पर्याय राहिले होते. त्यानंतर आयुषने वैभव सूर्यावंशीच्या हातात चेंडू दिला. वैभवच्या पहिल्या चेंडूवर सुदिनीने दोन धावा घेतल्या. त्यामुळे आता सुदिनी काय करणार, हे सर्व पाहत होते. पण आपल्या दुसऱ्याच चेंडूवर वैभवने सुदिनीला चकवा दिला आणि त्याला बाद करण्यात यश मिळवले. भारताच्या जे कोणत्याच गोलंदाजाला या सामन्यात जमले नाही ते वैभव सूर्यवंशीने करून दाखवले आणि अमेरिकेचा संघ तिथेच ऑल आऊट झाला. सुदिनीने यावेळी ३६ धावा केल्या, तर अमेरिकेचा संघ १०७ धावांत ऑल आऊट झाला.वैभव सूर्यवंशी धमाकेदार फटकेबाजी करतो, हे सर्वांनीच पाहिले आहे. पण आता गोलंदाजीतही त्याने कमाल करून दाखवली आहे.

# भारताचा वर्ल्ड कपच्या पहिल्याच सामन्यात मोठा विजय




**बुलोवायो :** भारताने वर्ल्ड कपच्या पहिल्याच सामन्यात अमेरिकेला धुळ चारत महारेकॉर्ड रचला. भारताने अमेरिकेच्या संघाला फक्त १०७ धावांत ऑल आऊट केले आणि त्यानंतर मोठा विजय साकारला.

भारतापुढे विजयासाठी १०८ धावांचे माफक आव्हान होते. त्यामुळे भारत हे आव्हान एकही विकेट न गमावता पूर्ण करेल, असे सर्वांना वाटत होते. पण त्यानंतर काही काळ पावसाचे आगमन झाले आणि खेळ थांबवण्यात आला. खेळ जेव्हा सुरु झाला तेव्हा वैभव सूर्यवंशी आणि आयुष म्हात्रे हे फलंदाजीला उतरले. भारताला यावेळी ३७ षटकांत ९६ धावांचे आव्हान देण्यात आले होते. वैभव सूर्यवंशीकडून यावेळी संघाला मोठ्या आशा होत्या, पण वैभव सूर्यवंशी यावेळी फक्त चारच चेंडू खेळला आणि दोन धावा करून बाद झाला. वैभवनंतर वेदांत त्रिवेदी आणि भारताचा कर्णधार आयुष म्हात्रेही लवकर बाद झाला. त्यामुळे भारताची ३ बाद २५ अशी अवस्था झाली होती. पण त्यावेळी भारताच्या मदतीला धावला तो अभिनव कंड. अभिनवने या सामन्यात पाच चौकार आणि एका षटकाराच्या जोरावर नाबाद ४१ धावांची खेळी साकारली. त्यामुळे भारताला या लढतीत विजयावर शिक्कामोर्तब करता आले. भारताने हा सामना ११८ चेंडू राखत विजय मिळवला आणि एक मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला. १९ वर्षांखालील सामन्यात भारताचा हा मोठा विजय ठरला आहे.झिम्बाब्वेमध्ये वर्षांखालील वर्ल्ड कपला सुरुवात झाली आहे. भारताचा आज पहिला सामना अमेरिकेबरोबर होता. भारताने अमेरिकेला पहिल्या धावेवरच धक्का दिला. त्यानंतर भारताच्या गोलंदाजांनी अचूक आणि भेदक गोलंदाजी केली. भारताने अमेरिकेचा संघ फक्त ३९ धावांत तंबूत पाठवला होता. पण त्यानंतर अमेरिकेच्या नितीन सुदीनी याने भारताला चांगली लढत दिली आणि संघाकडून सर्वाधिक धावा केल्या. नितीनची विकेट भारताला मिळक नव्हती. यावेळी भारताचा कर्णधार आयुष म्हात्रेने वैभव सूर्यवंशीच्या हातात चेंडू सुपूर्द केला. वैभवने यावेळी आपल्यावर ठेवलेला विश्वास सार्थ ठरवला. कारण वैभवने दुसऱ्याच चेंडूवर नितीनला बाद केले आणि अमेरिकेचा संघ १०७ धावांमध्ये ऑल आऊट झाला. अमेरिकेच्या नितीनने एकाही लढत देत यावेळी ३६ धावा केल्या.भारताने वर्ल्ड कपच्या पहिल्या सामन्यात दमदार विजय मिळवला आहे. आता दुसऱ्या सामन्यात ते कशी कामगिरी करतात. याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असेल.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बाहुबली : द एपिक मधून तमन्नाच्या दृश्यांवर कात्री

**मुंबई :** एस एस राजामौली दिग्दर्शित 'बाहुबली' या मुव्ही सीरिजने प्रेक्षकांना अक्षरश: वेड लावले होते. आंतरराष्ट्रीय स्तरावर हे दोन्ही चित्रपट हिट ठरले. गेल्या काही महिन्यात रीरीलिजचा ट्रेन्ड पाहायला मिळतो आहे. 'बाहुबली'देखील पुन्हा एकदा रीलिज होणार असून, दोन्ही भाग एकत्रित करुन हा सिनेमा रीलिज केला जाणार आहे. दोन्ही भागांचा मिळून एकच सिनेमा असल्याने, याआधी लोकप्रिय झालेली काही दृश्य 'बाहुबली: द एपिक'मधून हटवण्यात आली आहेत. तमन्ना भाटिया असणारी काही दृश्य सिनेम ातून काढण्यात आली आहेत. अलिकडे राजामौली यांनी सिनेमातील कोणती दृश्ये कापली आहेत, याविषयी भाष्य केले.



प्रभास आणि राणा दग्गुबाती यांच्यासोबतच्या प्रमोशनल मुलाखतीत एसएस राजामौली म्हणाले, 'दोन्ही भाग एकत्र करून आणि रोलिंग टायटल काढून टाकल्यास, एकूण कालावधी सुमारे पाच तास आणि २७ मिनिटे झाला असता. मात्र, सध्याचे व्हर्जन ३ तास आणि ४३ मिनिटांचे आहे. काढून टाकण्यात आलेल्या प्रमुख भागांमध्ये अवंतिकाची शिवुदूसोबतची प्रेमकहाणी, 'पाचा बोटेसिना', 'कन्ना निदुरिंचरा' आणि 'इरुकुपो' यांचा समावेश आहे. युद्धाच्या भागांमधील अनेक दृश्ये देखील ट्रिम करण्यात आली आहेत.'त्यांनी पुढे म्हटले, ''बाहुबली'मधील प्रत्येक दृश्याचे एक भावनिक वजन आहे आणि त्याला कथनात्मक महत्त्व आहे. आम्हाला नवीन व्हर्जन पूर्णपणे कथेवर आधारित असावी असे वाटत होते. पहिला कट सुमारे चार तास दहा मिनिटांचा होता. आम्ही वेगवेगळी पार्श्वभूमी असणाऱ्या सिनेमाशी संबंधित असणाऱ्या आणि नसणाऱ्या प्रेक्षकांसाठी एक विशेष स्क्रीनिंग आयोजित केले, त्यांचा अभिप्राय घेतला आणि नंतर सिनेमा तीन तास ४३ मिनिटांपर्यंत कमी केला.'बाहुबली: द एपिक' च्या संकल्पनेविषयी राजामौली म्हणाले, 'आम्हाला पाच वर्षांपूर्वी ही कल्पना सुचली होती की, ही कथा एकाच चित्रपटात सांगता येईल का असा विचार होता. आम्ही एक अनुक्रमाने कथन करण्याचा प्रयत्न केला; तो यशस्वी झाला नाही. नंतर आम्ही दृश्य कमी केली, तेही यशस्वी झाले नाही. शेवटी, आम्ही काही एपिसोड काढून टाकण्याचा निर्णय घेतला.'

# दिलजीला खलिस्तानी संघटनेकडून धमक्या

**मुंबई :** गायक आणि अभिनेता दिलजीत दोसांझ पुन्हा एकदा चर्चेत आलाय. दिलजीतनं नुकतीच कौन बनेगा करोडपती या शोमध्ये हजेली लावली होती. या मध्ये त्यानं केलेल्या एका कृतीवर आक्षेप घेत खलिस्तानी समर्थकांनी त्याला धमक्या दिल्या आहेत.



खलिस्तानी संघटना शीख फॉर जस्टिसनं पंजाबी गायक दिलजीत दोसांझ याच्या १ नोव्हेंबर रोजी ऑस्ट्रेलियात होणाऱ्या कॉन्सर्टपूर्वी त्याला धमक्या दिल्या आहेत. या दिवशी अकाल तख्त साहिबनं 'शीख नरसंहार स्मरण दिन' घोषित केला आहे.घइउ या शोमध्ये दिलजीतनं अनेक विषयांवर गप्पा मारल्या. यानंतर तो महानायक अमिताभ बच्चन यांच्या पाया पडला, आशीर्वाद घेतले. पण ही गोष्ट खलिस्तानी समर्थकांना खटकली अनब त्याला धमक्या दिल्या जात आहेत. दहशतवादी संघटनेनुसार, अमिताभ बच्चन यांनी ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी 'खून का बदला खून' अशा घोषणा दिल्या होत्या. त्यानंतर झालेल्या हिंसक जमावानं नरसंहार केला, ज्यात देशभरात ३०,००० हून अधिक शीख पुरुष, महिला आणि मुले मारली गेली. Sikhs for Justice चे जनरल कौन्सिल गुरपतवंत सिंग पन्नू म्हणाले, 'अमिताभ बच्चन, ज्यांच्या शब्दांनी या घटनेला चिथावणी दिली, त्यांचे पाय धरून दिलजीत दोसांझ यांनी १९८४ च्या शीख नरसंहारातील प्रत्येक पीडित, प्रत्येक विधवा आणि प्रत्येक अनाथ यांचा अपमान केला आहे. ही अज्ञानता नाही तर विश्वासघात आहे.

# फिल्मफेअर पुरस्कार विकत घेतल्याचा आरोप करणाऱ्यावर भडकला अभिषेक



**पुणे :** मनोरंजन विश्वातील कलाकारांवर अनेकदा आरोप होतो की, प्रतिष्ठित पुरस्कार हे कलाकार विकत घेतात. अलिकडेच फिल्मफेअर पुरस्कारावर नाव कोरणाऱ्या अभिषेक बच्चनवरही असाच आरोप करण्यात आला आणि अभिनेत्याने त्यावर सडेतोड उत्तर दिलं. एक्स प्लॅटफॉर्मवर अभिषेकचा फोटो शेअर करत एका युजरने त्याच्यावर टीका केली होती, त्यानेही या प्लॅटफॉर्मवरच पोस्ट शेअर करत प्रत्युत्तर दिले आहे.अलिकडेच झालेल्या ७० व्या फिल्मफ ेअर सोहळ्यात अभिषेकला 'आय वॉन्ट टू टॉक' या सिनेमासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार स्वीकारताना अभिषेकने भावुक प्रतिक्रियाही दिली होती, कारण २५ वर्षांच्या कारकिर्दीमध्ये त्याला पहिल्यांदाच हा पुरस्कार मिळाला. अभिनेत्यासाठी अत्यंत महत्वाच्या ठरलेल्या या पुरस्कारावरुनच त्याला टीका सहन करावी लागते आहे.या वर्षी 'आय वॉन्ट टू टॉक' या सिनेमासाठी पुरस्कार जिंकला... असा चित्रपट जो काही मोजक्या पैसे घेतलेल्या समीक्षकांशिवाय कोणीही पाहिला नाही आणि आता तर मला असेही ट्वीट दिसले की, २०२५ हे त्याचे वर्ष आहे. हे खूपच हास्यास्पद आहे! त्याच्यापेक्षा खूप चांगले कलाकार आहेत ज्यांना अधिक ओळख, काम, कौतुक आणि पुरस्कार मिळायला हवेत. पण दुर्दैवाने त्यांच्याकडे हुशार झठ आणि पैसा नाही.'टीकेवर उत्तर देताना अभिषेक असे म्हणाला की, 'मी कधीही कोणताही पुरस्कार विकत घेतलेला नाही किंवा झठ केलेला नाही. फक्त कठोर परिश्रम केले आहेत. पण, मी काहीही बोललो किंवा लिहिलं तरी तुम्ही त्यावर विश्वास ठेवाल अशी शंका आहे. म्हणून... तुमचे तोंड बंद करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे आणखी कठोर परिश्रम करणे, जेणेकरून भविष्यात पुन्हा कधीही कोणत्याही कामगिरीवर शंका उपस्थित करणार नाही.



# गोल्डन डिपनेक ड्रेसमध्ये प्राजक्ताने शेअर फोटो, वेधले चाहत्यांचे लक्ष..

**मुंबई :** मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री प्राजक्ता माळी हिचा प्रत्येक लूक चाहत्यांच्या चर्चेचा विषय ठरतो. पारंपरिक पेहरावात असो किंवा मॉडर्न आउटफिटमध्ये, प्राजक्ता नेहमीच आपल्या आत्मविश्वासपूर्ण आणि आकर्षक स्टाईलमुळे फॅन्सचे लक्ष वेधून घेते. नुकताच तिने आपल्या सोशल मीडियावर एक खास फोटो शेअर केला असून, तिचा गोल्डन गाऊन लूक सध्या चर्चेचा विषय बनला आहे. या फोटोमध्ये प्राजक्ताचा एलिगंट आणि रॉयल अंदाज पाहायला मिळतो. गोल्डन ऑफ-शोल्डर गाऊन, मिनिमल मेकअप आणि साधे दागिने या सगळ्यांनी एकत्र येऊन तिच्या सौंदर्याला वेगळाच ग्लो दिला आहे. पाहूया प्राजक्ताचा हा लूक कसा होता.

प्राजक्ताने परिधान केलेला गोल्डन ऑफ-शोल्डर गाऊन तिच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसा दिसतो. या आउटफिटमध्ये न चमकदार मेकअप, न अतिरेकी ॲक्सेसरीज. फक्त एक साधा पण एलिगंट गोल्डन ड्रेस. हलका शिमर, मऊ फॅब्रिक आणि फिटेड वेस्टलाइनमुळे हा गाऊन तिच्या ग्रेसफुल लूकला अधिक उठावदार बनवतो. हा लूक खास करून इव्हनिंग पार्टी, रेड कार्पेट इव्हेंट किंवा फ ेस्टिव्ह सीझनसाठी एक परफेक्ट पर्याय ठरू शकतो. प्राजक्ताने दाखवून दिलं आहे की साध्या डिझाईनचा गाऊन सुद्धा योग्य स्टायलिंगने किती उठावदार दिसू शकतो.या फोटोसोबत प्राजक्ताने दिलेलं कॅप्शन खूपच खास होतं ङ्गजश्रव ळी त्रेेष्ठवङ्ग. हे कॅप्शन तिच्या लूकइतकंच उठावदार ठरलं आहे. अनेक चाहत्यांनी या कॅप्शनवर प्रतिक्रिया देत लिहिलं, ङ्गखरंच, तूच गोल्ड आहेस! गोल्डन क्वीन!अशा कॉमेंट्सनी तिच्या पोस्टला भरभरून प्रेम दिलं आहे.या लूकमध्ये प्राजक्ताने मोठ्या स्टेटमेंट ज्वेलरीचा वापर न करता सोप्या पण उठावदार गोल्डन इयररिंग्स आणि ब्रॅसलेट घातले आहेत. या मिनिमलिस्टिक स्टाइलमुळे तिचा चेहरा आणि ड्रेस दोन्ही अधिक खुलून दिसतात. तिच्या दागिन्यांची निवड अगदी प्रसंगानुरूप आहे ना अतिरेकी, ना पूर्णपणे साधी, तर अगदी समतोल आणि क्लासी. अनेक वेळा झगमगत्या ड्रेससोबत जड दागिने घातल्यास लूकचा तोल बिघडतो, परंतु प्राजक्ताने अगदी योग्य प्रमाणात दागिने वापरून स्टाईल मंत्राचं उत्तम उदाहरण सादर केलं आहे. तिच्या गोल्डन इयररिंग्सनी चेहऱ्याच्या रचनेला उठाव दिला आहे, तर बारीक ब्रॅसलेटने संपूर्ण लूकला नाजूक आणि स्त्रीसुलभ स्पर्श दिला आहे.प्राजक्ताने या लूकसाठी हलका मेकअप निवडला आहे. न्यूड लिपशेड, थोडासा ब्लश आणि नाजूक आयलाइनर. तिचा टॉप बन हेअरस्टाइल या गाऊनसाठी परफेक्ट कॉम्बिनेशन ठरतो. ही हेअरस्टाइल चेहऱ्यायाची वैशिष्ट्ये अधिक उठावदार करते आणि संपूर्ण लूकला एक क्लासी टच देते.प्राजक्ताच्या या फोटोवर हजारो लाईक्स आणि शेकडो कॉमेंट्स पडल्या आहेत. चाहत्यांनी तिच्या स्टाईल सेन्सचं भरभरून कौतुक केलं आहे.या फोटोशूटमुळे पुन्हा एकदा सिद्ध झालं की प्राजक्ता माळी केवळ अभिनेत्री नाही, तर एक फॅशन आयकॉनही आहे ही गोष्ट सिद्ध झाली आहे.

***

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियानाचा सुरुवात

## निरोगी पिढीसाठी नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन

जनसंचलन/ बुलढाणा

जिल्हा परिषद आरोग्य विभाग व जिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने ङ्घअरुणोदयफ सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियानाचा भव्य उद्घाटन सोहळा आज जिल्हा रुग्णालय परिसरात उत्साहात पार पडला. यावेळी बाह्यरुग्ण विभाग परिसरात जिल्हा नर्सिंग कॉलेजच्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनींनी प्रश्नमंजुषा स्वरूपात सिकलसेल ॲनिमिया विषयक जनजागृती कार्यक्रम सादर केला. जिल्हा आरोग्य अधिकारी मा. डॉ. अमोल गीते यांनी उपस्थित नागरिकांना सिकलसेल आजारासंदर्भात प्रश्न विचारून उत्स्फूर्त सहभाग घेतला. तसेच दि. १५ जानेवारी ते ०७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या ङ्घअरुणोदयफ विशेष अभियाना ची सविस्तर माहिती देत जनजागृती केली. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांनी सिकलसेल ॲनिमिया आजाराची कारणे, लक्षणे, उपचार पद्धती तसेच वेळेवर तपासणीचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रंजीत मंडाले यांनी लग्नापूर्वी सिकलसेल तपासणी करणे अत्यंत आवश्यक असल्याचे नमूद करून, निरोगी पिढीसाठी नागरिकांनी या मोहिमेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले. या अभियानांतर्गत जिल्ह्यातील नागरिकांनी मोफत सिकलसेल तपासणी करून घ्यावी व आरोग्यदायी भविष्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमास जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी, जिल्हा सिकलसेल समन्वयक सिताराम मोरे, नर्सिंग ऑफिसर उंबरकर, समुपदेशक गाडेकर, जिल्हा नर्सिंग कॉलेजच्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनी, आरोग्य कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# जड वाहनांसाठी नवीन पसंती क्रमांक मालिका सुरु

जनसंचलन/बुलढाणा



उप प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत जड वाहनांसाठी पसंती क्रमांकाकरिता २८ ही नवीन मालिका सुरु करण्यात येणार आहे. ही मालिका दि. १९ जानेवारी २०२६ पासून सुरु होणार असून, ०००१ ते ९९९९ पर्यंतचे क्रमांक वाहनधारकांसाठी उपलब्ध राहणार आहेत. पसंती क्रमांक घेऊ इच्छिणाऱ्या जड वाहनधारकांनी नियमांनुसार अधिकृत प्रक्रियेद्वारे अर्ज सादर करावा. या सेवेअंतर्गत निश्चित शुल्क आकारण्यात येणार असून, पसंती क्रमांकांचे वाटप शासनाने विहित केलेल्या पद्धतीने करण्यात येईल. इच्छूक वाहनधारकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी रघुवीर सिंग बिलावर यांनी केले आहे.

# जिल्हास्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सवाला प्रारंभ

जनसंचलन/बुलढाणा

महिला व बाल विकास विभागामार्फत आयोजित जिल्हास्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सवाचे उद्घाटन प्रमुख, जिल्हा व सत्र न्यायाधीश आर.एन.रोकडे यांच्या हस्ते करण्यात आले. बाल कल्याण क्षेत्रात कार्यरत असलेल्या शासकिय स्वयंसेवी संस्थांमध्ये पुनर्वसनासाठी दाखल झालेल्या अनाथ, निराधार, निराश्रीत, उन्मार्गी मुलांमधील सुप्त गुणांना वाव देऊन त्यांच्यात एकमेकांविषयी बंधुभाव, सांघिक भावना निर्माण होण्यासाठी दि. १५ ते १७ जानेवारी या कालावधीत जिल्हास्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सवाचे आयोजन शासकीय मुलांचे बालगृह/निरीक्षणगृह, शरद महाविद्यालय परिसर चिखली रोड, बुलढाणा येथे करण्यात आले आहे. या बाल महोत्सवामध्ये अनाथ, काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांसाठी विविध क्रीडा तसेच सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव नितीन पाटील, बाल न्याय मंडळच्या अध्यक्ष शितल बजाज, बाल कल्याण समितीचे अध्यक्ष मनोज डांगे, सदस्य आणि जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अमोल डिघुळे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. उद्घाटनाप्रसंगी प्रमुख, जिल्हा व सत्र न्यायाधीश आर.एन.रोकडे यांनी अध्यक्षीय भाषणात महोत्सवाचे कौतुक करून बालकांना प्रोत्साहनपर शुभेच्छा दिल्या. प्रमुख पाहुणे नितीन पाटील यांनी बालकांना दिलेल्या मंचाचा सुवर्ण संधी म्हणून लाभ घेवून आनंद द्विगुणीत करावा तसेच जिंकू किंवा हरू याचा विचार न करता सहभाग महत्वाचा आहे, हे बालकांना पटवून दिले. या महोत्सवाच्या प्रास्ताविकामध्ये बाल महोत्सवाचा उद्देश, बालकांतील सुप्त गुणांना क्रीडा, बौद्धीक व सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून मुलांमध्ये आदर, प्रेम निर्माण होऊन मुलांमधील कला गुणांना वाव मिळेल तसेच आत्मविश्वास व सांघीक भावना विकसित होण्यास मदत होणार असून त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी हा उपक्रम अत्यंत महत्वाचा असल्याचे तसेच पुस्तकांसोबत बाहेरील बालकांच्या जगाचे महत्व याची जाणीव जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी करून दिली आणि सदर बाल महोत्सवाकरीता अविरत मेहनत घेवून कार्यक्रमाचे यशस्वीतेकरीता सतत सक्रीय असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचे आभार मानून कौतुक केले. कार्यक्रमाचे संचालन परिवीक्षा अधिकारी सरिता जाधव, शिक्षक केशव घुगे यांनी केले, तर आभार कनिष्ठ संरक्षण अधिकारी वसू यांनी मानले. कार्यक्रमास पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी तसेच बालक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# शेगाव येथे आजपासून तीन दिवसीय पीएम विश्वकर्मा प्रदर्शनी व विक्री मेळावा

जनसंचलन/बुलढाणा

भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्यम मंत्रालयांतर्गत, एमएसएमई विकास कार्यालय, नागपूर आणि जिल्हा उद्योग केंद्र, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने शेगाव येथे भव्य पीएम विश्वकर्मा प्रदर्शनी व विक्री मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा दि. १६, १७ आणि १८ जानेवारी २०२६ रोजी शेगाव येथील अग्रसेन भवन येथे संपन्न होणार आहे. या प्रदर्शनीचे उद्घाटन शुक्रवार, १६ जानेवारी रोजी दुपारी २:३० वाजता मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. संजय कुटे आणि बुलढाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील उपस्थित राहणार आहेत. तसेच एमएसएमई नागपूरचे संचालक व्ही. आर. सिरसाठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांच्यासह विविध बँकांचे व प्रशासकीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत. प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेअंतर्गत नोंदणीकृत असलेल्या १८ विविध प्रकारच्या पारंपरिक कारागिरांना आपल्या उत्पादनांचे प्रदर्शन आणि विक्री करण्यासाठी हे हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. यामध्ये सुतार, लोहार, कुंभार, मूर्तिकार, चर्मकार आणि इतर ग्रामीण कारागिरांच्या हस्तकलेचे नमुने पाहायला मिळतील. कारागिरांना आधुनिक बाजारपेठेची ओळख करून देणे आणि त्यांच्या आर्थिक उन्नतीला चालना देणे हा या प्रदर्शनीचा मुख्य उद्देश आहे. जिल्हा उद्योग केंद्र, बुलढाणाचे महाव्यवस्थापक यांनी जिल्ह्यातील नागरिकांना या प्रदर्शनीला जास्तीत जास्त संख्येने भेट देण्याचे आवाहन केले आहे. ङ्घआपल्या जिल्ह्यातील स्थानिक कारागिरांच्या कौशल्याला प्रोत्साहन देण्यासाठी आणि व्होकल फॉर लोकल या संकल्पनेला बळकटी देण्यासाठी हे प्रदर्शन अत्यंत महत्त्वाचे आहे,ङ्घ असे त्यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे. हे प्रदर्शन सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत सर्व नागरिकांसाठी विनामूल्य खुले राहणार असून जास्तीत जास्त नागरिकांनी या प्रदर्शनीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# रात्री भरती, पहाटे मृत्यू! १७ वर्षीय सेजलच्या मृत्यूनंतर बुलढाण्यात खळबळ...

## नातेवाईकांचा डॉक्टरांवर गंभीर आरोप, अखेर डॉक्टरांची बाजू समोर...

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा शहरातील न्यूरॉन हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असतानाच १७ वर्षीय सेजल या तरुणीचा सकाळी मृत्यू झाल्याने मोठी खळबळ उडाली आहे. बुधवारी मध्यरात्री गंभीर अवस्थेत दाखल झालेल्या या तरुणीचा अवघ्या काही तासांत मृत्यू झाल्याने नातेवाईकांनी डॉक्टरांवर हलगर्जीपणाचे गंभीर आरोप करत रुग्णालयात प्रचंड गोंधळ घातला. संतप्त नातेवाईकांच्या आक्रोशामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मिळालेल्या माहितीनुसार, सेजल ही तरुणी मेंदूच्या गंभीर आजाराने त्रस्त होती. बुधवारी रात्री सुमारे १२ वाजता तिला बुलढाण्यातील न्यूरॉन हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्यावेळी ती दोन तासांपासून बेशुद्ध अवस्थेत होती, अशी माहिती तिच्या आईने डॉक्टरांना दिली. प्रकृती अत्यंत नाजूक असल्याने तातडीने तिला उच्च उपचारासाठी इतरत्र हलवावे, असा सल्ला डॉक्टरांनी दिला होता. मात्र आर्थिक परिस्थिती नाजूक असल्याने ङ्क्षइथेच उपचार सुरू करा,फ्फ असा आग्रह नातेवाईकांनी धरल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे. न्यूरॉन हॉस्पिटलचे डॉ. निलेश वाघ यांनी दिलेल्या माहितीनुसार, सेजल हिच्यावर याआधी मेंदूतील कॅन्सरसाठी मुंबई येथे शस्त्रक्रिया झाली होती. त्यानंतर औषधोपचार सुरू होते. मात्र बुधवारी रात्री दाखल करताना रुग्णाने कोणती औषधे, किती प्रमाणात घेतली, याची स्पष्ट माहिती नातेवाईक देऊ शकले नाहीत.




त्यामुळे उपचारात अडचणी आल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे. गुरुवारी सकाळी रुग्णाची प्रकृती तशीच गंभीर होती. अचानक रक्तदाब वाढल्याने परिचारिकेला आवाज देण्यात आला. डॉक्टर रुग्णाकडे निघाले असतानाच सेजलचा मृत्यू झाला. यानंतर संतप्त नातेवाईकांनी डॉक्टरांवर आरोपांची झोड उठवत मोठा आक्रोश केला. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याने पोलिसांना पाचारण करण्यात आले. दरम्यान, उपचाराची पार्श्वभूमी लक्षात घेता काही नातेवाईकांनी मृतदेह घरी नेल्याचे डॉ. वाघ यांनी सांगितले.

# ऑनलाइन फसवणूक ते आर्थिक गुन्हे, विश्वासावर घाला की नव्या युगातील दरोडे ?

**जनसंचलन/बुलढाणा**

आजचा गुन्हेगार रस्त्यावर पिस्तूल घेऊन उभा राहतोच असे नाही. तो मोबाईलच्या स्क्रीनआडून, बनावट लिंक, फसवे संदेश आणि खोट्या कागदपत्रांच्या आधारे थेट नागरिकांच्या बँक खात्यात घुसतो. बुलढाणा जिल्ह्यात वाढत असलेली ऑनलाइन आर्थिक फसवणूक आणि सायबर गुन्हेगारी ही गुन्हेगारीच्या बदलत्या स्वरूपाची ठळक खूण आहे. गेल्या वर्षभरात जिल्ह्यात ७हजारांहून अधिक गुन्ह्यांची नोंद झाली असून, त्यात फसवणूक, आर्थिक गुन्हे, चोरी. घरफोडी. मारहाण आणि शस्त्रसंबंधित गुन्ह्यांचे प्रमाण लक्षणीय आहे. विशेषतः ऑनलाइन फसवणूक, बँकिंग घोटाळे आणि डिजिटल आमिषांद्वारे होणारे गुन्हे शहरापुरते मर्यादित न राहता लगतच्या ग्रामीण पट्ट्यापर्यंत पोहोचले आहेत. ङ्क्षतुमचे खाते ब्लॉक होणार आह केवायसी अपडेट कराङ्क्ष, ङ्क्षलिंकवर क्लिक करा, अशा साध्या संदेशांतून शेतकरी, नोकरदार, ज्येष्ठ नागरिक



सहज फसवले जात आहेत. यात केवळ आर्थिक नुकसानच होत नाही, तर प्रशासन, बँकिंग व्यवस्था आणि डिजिटल व्यवहारांवरील नागरिकांचा विश्वासही डळमळीत होतो. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी गेल्या वर्षात आर्थिक व सायबर गुन्ह्यांवर लक्ष केंद्रीत करत १२६ शस्त्रप्रकरणांत कारवाई, ५४ देशी कट्टे व अन्य शस्त्रांची जप्ती, तसेच लाखो रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. शहर-ग्रामीण सीमारेषेवरील लगतचे पट्टे हे गुन्हेगारांसाठी तुलनेने सुरक्षित ठिकाणे ठरत असल्याचेही तपासातून समोर आले आहे. मात्र, केवळ कारवाई पुरेशी ठरत नाही. डिजिटल साक्षरता, त्वरित तक्रार, बैंक-पोलीस समन्वय आणि नागरिकांची जागरूकतेशीवाय हा लढा अपुरा राहील. कारण आजचा गुन्हा पकडला गेला, तरी उद्याचा गुन्हेगार आजच तयार होण्याची शक्यता नाकारता येत नाही

# पोलिस कर्मचाऱ्याला धमकी, गुन्हा दाखल




**जनसंचलन/ शेगाव**

शेगाव शहरातील मंदिर परिसरात अतिक्रमण हटविण्याबाबत सूचना देणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्याला धक्काबुक्की करून शिवीगाळ व धमकी दिल्याची घटना १५ जानेवारी रोजी दुपारी १२:३० वाजताच्या सुमारास लहूजी वस्ताद चौक परिसरात घडली. या प्रकरणी शेगाव पोलिसांनी युतकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबत पोलिस हवालदार राहुल रामकुमार पांडे (वय ४०) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, पांडे हे सहकारी पोलिस कर्मचाऱ्यांसह संत गजानन महाराज मंदिराजवळील लहूजी वस्ताद चौक येथे रस्त्यावरील दुकानदारांना दुकाने रस्त्याच्या कडेला न लावण्याबाबत सूचना देत होते. त्यावेळी पांडुरंग ऊर्फ श्याम गजानन चांदुरकर (वय २८, रा. अकोट रोड, शेगाव) याने शासकीय कामात अडथळा निर्माण केला.,

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८